Impact Factor 4.574

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Journal

VOL-V ISSUE-VI June 2018

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# प्रेमानंद गज्वींच्या एकांकिकातील तांत्रिकता

**कु. स्नेहलता मनोहरराव आवळे**
एम.ए. बी.एड्., एम.फिल., पीएच.डी.

**प्रस्तावना**

गेल्या पावशतकातील प्रेमानंद गज्वी याच्या नाटय लेखनाचा प्रवास थक्ककरून सोडणारा आहे. एकूण बारा एकांकिका आणि दहा नाटंके त्याच्या नावावर आहेत. भारतीय समाज आणि सामाजिक मनोवृत्ती समजून घेवून भेदक वास्तवाचे दर्शन वाचक श्रोत्यांना घडविणे असा सांस्कृतिक आणि वैचारिक धांडोळा घेत त्यांनी आपल्या विविध नाटय कृतींना एक वेगळी उंची प्राप्त करून दिली आहे. भारतीय समाजातील समस्या हा त्यांच्या नाटयलेखनातील केंद्रवर्ती भाग आहे. शोशित वंचितांची बाजू घेवून हयांची नाटके उभी राहतात, सामाजिक सांस्कृतिक जगतातील अंधश्रध्दा, स्त्रीदास्य, तत्वभ्रष्टता, अनिष्ट रूढी–परंपरा या सर्वांच्या विरोधात बंडाखोरी पुकारणारी जाणीव त्यांच्या नाटकात आहे.

'घोटभर पाणी' या एकांकिकेने प्रेमानंद गज्वी हे नाव सर्वदूर पोहचले त्यांनतर त्यांच्या 'कुणाचे ओझे', 'एकी एके शून्य, 'अभरण्यातील ससा', 'बांडगूळ', 'देवनवरी', 'बेरीजवजा बाकी', 'गहान', 'उतारा', कृष्ण विवर', हे राम', 'पक्षी', अशा एकापेक्षा एक सरस एकांकिका त्यांनी रंगाभूमीला दिल्या.

'घोटभर पाणी' ने इतिहास घडवला हजारापेक्षा अधिक प्रयोग झाले. ३५० च्या वर पुरस्कार मिळाले. ही एकांकिका एकमेवद्वितिय झाली तेव्हा त्यात वापरलेले नाटयतंत्र कोणते याचा विचार येथे करावा लागेल. 'घोटभर पाणी' चा तंत्रदृष्टया पहिला विशेश म्हणजे ती एकांकीका आहे. दोन पात्र आणि चौदा भूमिका अशी विभागणी केलेली आहे. आलटून पालटून ती दोनच पात्रे आपली भूमिका बदलत असतात. या एकांकिकेचा सगळा व्यापार हा 'मेक बिलिव्ह तंत्रावर चाललेला आहे तहानेने व्याकूळ दोन युवकांची भटकंती चाललेली असतांना 'दुसरा वॅटर बॅग देतोस तहान लागली' म्हणताच पहिला जवळ असलेली वॉटरबॅग काढतो तिचे झाकण उघडतो ओंजळीत ओततो, प्रेक्षकांनी आणि अभिनयकर्त्यांनी वॉटरबॅग आहे असेच गृहीत धरायचे. तिसऱ्या दृश्यात पोलीस पाटील आणि चोखा कांबळे यांच्या संवादात पोलीस पाटलाने'', हाना रे भडव्याला, काढा हयाचा पाणी बाहीर (पृ.३), असा आदेश देताच चोखा कांबळेची भूमिका करणारा कुणी तरी आपल्याल्या मारतोय असा अभिनय करतो तेव्हा त्याचे पडणे, ओरडणे, प्रेक्षकांनी समजून घ्यायचे असते कधी पोलीस पाटील,कधी प्रधान, कधी राजा, कधी मोर्चेकरी, कधी गावकरी अशा निरनिराळया भूमिका ते दोन पात्र करतात. हे काहीसे तमाशातील तंत्र आहे. तिचा डोलारा सगळा अभिनय कर्त्याच्या अभिनयावर अवलंबून असतो तंत्राच्या या नवेपणामुळेच ही एकांकिका तेवढीच ताजी नि कुठेही सादर करता येईल अशीच आहे.

गज्वींची 'एकी एके शून्य' तंत्राच्या बाबतीत जुन्या वळणाची, सरळसोट जाणारी असून तंत्राबद्दल कुठेलेही असे नाविण्य त्यात नाही. सगळी एकांकिका संपतरावांची बैठक आणि प्रज्ञानंदाची मठी यातच आलटून पालटून घडणाऱ्या प्रसंगानुसार पुढे जाते सहाव्या प्रसंगात मात्र तिसरेच स्थान सुचित होते ते म्हणज चौक. शेवटी एकाचवेळी प्रज्ञानंदाची मठी आणि संपतरावांची बैठक दाखविली आहे.

'कुणाचे ओझे' याात मात्र स्वप्नसदृश्य पध्दतीचा अवलंब गज्वींना केलेला आहे ही एकांकिका सुरू होते ती एका जंगलवजा भागातील मोडक्या घरात, धुळ कोष्टीकरांनी व्यापलेल्या घरात. तो त्याच्या आयुष्यात घडलेल्या प्रसगांना सांगत असतांना स्वप्न सदृश्य पध्दतीचे तंत्र गज्वींनी योजले आहे तो त्याच्या नर्स असलेल्या बहिणीवर गृहमत्र्यांनेकेलेला बलात्कार, 'तो' च्या वडिलाचा मृत्यू हे सगळे प्रसंग स्वप्नसदृश्य पध्दतीने घडतात. बहिणीवर झालेल्या बलात्काराचा सूड उगवण्यासाठी गृहमंत्र्याच्यामुलीचे अपहरण करतो, तिला ओलीस ठेवतो, पण तिला स्पर्श करीत नाही व शेवटी 'तो' तिला एकटीला टाकून निघून जातो येथे दृश्यदिसत नाही. पण आधीच्या संवादातील काही वाक्य तिला आठवतात. ती केवळ आवाजरूपाने ऐकू येतात हा तंत्रदृष्टया नवा प्रयोग गज्वींना केलेला आहे. असाच प्रयोग त्यांनी 'गहाण' या एकांकिकेतही योजिला आहे. गण्याची पत्नी सारजाच्या मृत्यूचा प्रसंग स्वप्नसदृश्य पध्दतीने घेतलेला आहे.

'अभयारण्यातील ससा', 'बांडगूळ', 'बेरीजवजा बाकी', या एकांकिका तंत्रदृष्टया सरळसोट जाणाऱ्या आहेत. त्यात फारसे नाविण्य नाही. 'अभयारण्यातील ससा' मध्ये एका प्रसंगात एकाच वेळी दोन दृश्ये रंगमंचावर दाखवून त्या दोन दृश्यांमध्ये असलेला सहज संवाद पाहण्यासारखा आहे तसेच याच एकांकीकेत स्वागतासाठी योजलेली अंतर्मनाचे तंत्र मात्र प्रभावी ठरले आहे.बेरीजवजा बाकी' मध्ये एकाच व्यक्तीतून दुसरी व्यक्ती म्हणून पुढे येते व त्यांच्या संवादातून नाटय फुलते.

'देवनवरी', 'गहाण', 'उतारा' या एकांकिका मधून गज्वींनी लोकनाटयाच्या तंत्राचा अवलंब केलेला आहे. परंपरागत लोकनाटयामध्ये पुराण विषय, परंपरा, रुढी, इ. विषय येत गज्वींनी परंपरेशी फटकून वागणारे नृत्य वाद्य, संगीत याचा उपयोग एकांकिकेत केलेला आहे. लोकनाटयात आढळणारे 'समूहगान' ही यात आढळते. 'गहाण', 'उतारा', यामध्ये समूहगान असल्याचे दिसते.

'देवनवरी' मध्ये लोकनाटयतंत्राचा प्रभावीपण प्रकर्षाने दिसते. देवनवरीच्या पूर्वाधांतील कथा भाग पूर्णत: लोकनाटयाच्या पध्दतीने आलेला आहे. गद्यातून पद्याची लय साधलेली दिसते. लोकनाटयासारखा संवादामध्येही हजरजवाबीपणा, खटकेबाजपणा गज्वींनी यात घातलेला आहे.

'पक्षी' मध्ये गज्वींनी फॅण्टसीचे तंत्र वापरलेले दिसते. बोलका पोपट पण या एकांकितेतील पोपट अधिकच बोलतांना दिसतो त्यामुळे फॅण्टसी निर्माण होते.

'हे राम' ही एकांकिका पण फॅण्टसीच्या तत्वावर आधारीत आहे. पुतळा असलेल्या गांधीचे आपला चबुतरा सोडून जाणे, गांधी विचारांची गांधी अनुयायांनी केलेली वाताहल चित्रित केलेला आहे. फॅण्टसीच्या तंत्रामुळेच गज्वींचीही एकांकिका अतिशय रेखीव झाली आहे.

**निष्कर्ष**

एकूणच गज्वी सामाजिक समस्याप्रधान विषय हाताळणारे लेखक आहे. गज्वींची सामाजिक जाणिव संकुचित नाही. तर ती वैश्वीक, व्यापक स्वरूपाची दिसते दलितांचा घोटभर पाण्याचा प्रश्न, बुवाबाजी, व्यसनाधिनता, देवदासी, वेठबिगारी, उतारा, भ्रष्टाचार यासारख्या प्रथा, परंपरेनी विनलेली सामाजिक समस्याचे जाळे गज्वीं एक एक करीत भेदत जातात. गज्वींच्या ठिकाणी असलेल्या सामाजिक जाणिवेला आंबेडकरी विचारांची बैठक आहे. नकाराची भूमिका ते प्रभावीपणे मांडतात. विद्रोहाची मांडणी अतिशय संयत शब्दात करूनही हृदयभेदून जाण्याचे तंत्र त्यात असते कुठलाही आक्रस्ताळेपणा ते करीत नाही. कुठे कुठे परंपरा वरचढ ठरत असल्याचे दिसते त्यामुळे संस्कृतीशी विद्रोह पुकारून संघर्ष करणाऱ्या पात्राच्या पदरी अपयशच दिसते.

प्रेमानंद गज्वीं यांनी आपल्या एकांकिकेच्या केंद्रस्थानी विविध सामाजिक समस्या घेवून त्याला वास्तववादाची जोड देवून रंगभूमीला सशक्त परिणाम प्राप्त करून दिले आहे. त्यामुळेच नाटयक्षेत्रात त्यांची समर्थ स्थान निश्चिती झाली आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. प्रेमानंद गज्वी यांचा लेखन प्रवास, संपादक महेंद्र भवरे, लोकवाङ्:मय गृह, मुंबई, जानेवारी २०१२.
२. एकांकिका वाटचाल, श्री. र. भिडे, पृष्ठ क्र. १७,३५.
३. दलित नाटक रंगभूमी एक परिचय, ईश्वर नंदापूरे, साहित्यः ग्रामीण आणि दलित (संपा.) मदन कुळकर्णी, विजय प्रकाशन, नागपूर
४. प्रेमानंद गज्वीं, घोटभर पाणी, प्रस्तावना मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९८७.
५. नारा भवाळकर, नाटयपरंपरा : शोध आणि आस्वाद.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com